**MHKO100004662022**

## नियमित दिवाणी दावा क्र. ११७/२०२२ निशाणी क्र. १८ वरील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता याचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व त्यावर दाखल केलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, दावा शिषकामध्ये प्रतिवादी क्र. १ यांचे नाव "श्री रमेश थळोबा कांबळे" असे लिहीले गेले असून सदरचे नाव "श्री रमेश सुभाष कांबळे" असे नमूद होणे गरजेचे आहे. तसेच दावा अर्जी व निशाणी क्र. ५ चे अर्जामधील पान नं. ३ वरील वरुन ५ व्या ओळीत "रु.४६०" असे नमूद झाले आहे त्या ठिकाणी "रु.४५०" असे नमूद होणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये वादी यांना दुरुस्तीबाबत पुर्वीच माहिती व कल्पना होती अशी हरकत घेतली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची दिसते. सदरच्या दुरुस्ती केल्यामुळे मुळ कथनात बदल होणार नाही कारण कायद्याच्या स्थापित सिध्दातांप्रमाणे वादीला आपली केस स्वतःहून सिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावित दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी दाव्यामध्ये व निशाणी क्र. ५ चे अर्जामध्ये १४ दिवसांचे आत प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.08.24 12:56:00 +0530

ठिकाणः- गडहिंग्लज
दिनांक - १९/०८/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज